आकर्षक लग्न पत्रिका
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
— श्रीहरि पेपर प्रॉडक्टस् —
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.NO./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१०५ ■ सोमवार २० जानेवारी २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

## नागपुरात सरसंघचालकांविरोधात युवक काँग्रेसचे आंदोलन पोलिसांनी मोर्चा अडवला; प्रमुख पदाधिकाऱ्यांना अटक

**नागपूर, दि.१९- अयोध्येत २२ जानेवारी २०२४ रोजी श्री रामाची प्राणप्रतिष्ठा झाली तेव्हा देश खऱ्या अर्थाने मुक्त झाला, या सरसंघचालक डॉ.मोहन भागवतांच्या वक्तव्याविरोधात नागपुरात युवक काँग्रेसने आक्रमक पवित्र घेत आंदोलन पुकारले. युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदयभानू चीब यांच्या नेतृत्वात नागपूरातील देवडिया काँग्रेस भवनमधून निघून युवक काँग्रेसचे कार्यकर्ते संघ मुख्यालयाच्या दिशेने निघाले. मात्र विनापरवानगी करण्यात येणाऱ्या या आंदोलनाला आणि युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना संघ मुख्यालयाच्या दिशेने जाण्यापासून पोलिसांनी मध्येच रोखले.**




संघाने आधी ध्वजाचा अवमान केला. आता स्वातंत्र्याचा अपमान करत आहे, अशा आशयाचे बॅनर्स घेऊन कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. यावेळी संघावर बंदी घाला, अशी मागणीही युवक काँग्रेसचे कार्यकर्त्यांनी केली. यावेळी गोंधळ होण्याची शक्यता लक्ष्यात घेता पोलिसांनी या कार्यकर्त्यांना थांबवण्यासाठी चिटणीस पार्क चौकावर आधी पासूनच जोरदार बंदोबस्त लावला होता. दरम्यान युवक काँग्रेसचे कार्यकर्ते संघ मुख्यालयाच्या दिशेने निघाले असताना पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र कार्यकर्ते जास्त संख्येने असल्याने समोर जात होते. अशातच कार्यकर्ते ऐकत नसल्याचे बघून पोलिसांनीही बळाचा वापर करून कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष कुणाल राऊत हेही उपस्थित होते.

यावेळी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदयभानू चीब यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण बघायला मिळाले. मात्र पोलिसांनी परिस्थितिवर नियंत्रण मिळवत **(पान ४ वर)**

## कुंभमेळ्यात आग मंडप जळून खाक

प्रयागराज, दि.१९- प्रयागराजच्या महाकुंभ मेळ्यात भीषण आग लागल्याची माहिती समोर आली आहे. या आगीमध्ये तंबू आणि इतर साहित्य जळून खाक झाले. महाकुंभ मेळ्यात मोठी गर्दी असताना लागलेल्या आगीमुळे सर्वांकडून चिंता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, तंबूत असलेल्या सिलेंडरच्या स्फोटामुळे ही आग लागल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. भीषण आग लागल्याने आणि ही आग पसरत चालल्याने महाकुंभमेळ्यात भीती पसरली. शास्त्री पूल ते रेल्वे ब्रिज दरम्यानच्या परिसरात ही आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. हा संपूर्ण परिसर महाकुंभमेळा परिसरात येतो. महाकुंभ २०२५ मध्ये आतापर्यंत ७ कोटींहून अधिक भाविक **(पान ४ वर)**

## सैफ अलीवरील हल्लेखोर बांगलादेशी घुसखोर असल्याचा संशय वकिलांचा इन्कार; आरोपीला पाच दिवसांची पोलीस कोठडी

**मुंबई, दि.१९- बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर झालेल्या चाकूहल्ला प्रकरणात आरोपीला छत्तीसगडमधून पोलिसांनी अटक केली आहे. आज आरोपी मोहम्मद शेहजादला मुंबईतील वांद्रे न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी न्यायालयाने आरोपी मोहम्मद शेहजाद याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाचा अहवाल न्यायालयाने सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.**



दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणात वेगवेगळा संशय व्यक्त केला. आरोपीकडे भारतातील कोणतेही वैध भारतीय कागदपत्र नसल्याची माहिती समोर येत आहे. तसेच तो बांगालादेशमधून बेकायदेशीरपणे भारतात आल्याचा संशय आहे. याबाबत आता पोलिसांच्या तपासानंतर अधिक माहिती समोर येणार आहे.

न्यायालयातील सुनावणी दरम्यान नेमकं काय घडले? याविषयीची माहिती आरोपी मोहम्मद शेहजाद याची बाजू मांडणाऱ्या वकिलांनी माध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, न्यायालयाने पाच दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. आरोपी मोहम्मद शेहजाद याला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तसेच आरोपी बांगलादेशी आहे हे अद्याप सिद्ध झालेले नाही. तसेच या प्रकरणात कोणताही आंतरराष्ट्रीय संबंध नाही. आरोपी शहजाद हा सात वर्षपेक्षा जास्त कालावधीपासून मुंबईत राहत आहे. मात्र, मोहम्मद शेहजाद हा आधी बांगलादेशमध्ये राहत होता. आता तो मुंबईत राहत आहे. या संपूर्ण प्रकरणात कोणताही **(पान ४ वर)**



## आदिवासी तरुण योहान गावित यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी सन्मान

**नंदुरबार,दि.१९ (प्रतिनिधी) - जिल्ह्यातील नवापूर तालुक्यातील भवरे या लहानशा आदिवासी वस्तितील शेतकरी योहान अरविंद गावित यांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर संपूर्ण देशाला प्रेरणा दिली आहे. पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड देत त्यांनी पिंजऱ्यातील मत्स्य व्यवसायातून असामान्य यश प्राप्त केले आहे. त्यांच्या या कर्तृत्वाची दखल घेत भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रजासत्ताकदिनी (२६ जानेवारी) त्यांना राजधानी दिल्ली येथे सन्मानित करण्यात येणार आहे.**

भवरे या संपूर्ण आदिवासी वस्ती असलेल्या गावात राहणाऱ्या योहान गावित यांनी आठ वर्षांपूर्वी आपल्या पारंपरिक शेतीसोबत मत्स्यपालन व्यवसाय सुरू केला. मत्स्य व्यवसायाला चालना देण्यासाठी त्यांनी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत शासनाकडून साठ टक्के अनुदान मिळवले. या योजनेतून त्यांना १८ पिंजरे उभारण्यासाठी सुमारे ३२.४० लाख रुपयांचे अनुदान मंजूर झाले. योहान गावित यांनी या आर्थिक **(पान ४ वर)**

## किराणा दुकान फोडून पासष्ट हजार लांबविले

धुळे, दि.१९- दोंडाईचातील गौसिया नगरातील किराणा दुकान अज्ञात चोरट्यांनी फोडून दुकानातील पासष्ट हजार रूपयांची रोख रक्कम चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. सादीक रूबाब खाटीक यांनी दि.१४ जानेवारी रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, गौसिया नगरातील किराणा दुकानाचे शटर अज्ञात चोरट्यांनी दि.१२ जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास उचकावून आत प्रवेश केला. दुकानाच्या गल्ल्यात ठेवलेली पासष्ट हजार रूपयांची रोख रक्कम चोरून नेली. या प्रकरणी दोंडाईचा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नाट्यगृहाची देखभाल करणाऱ्या संस्थेवरील पालिकेच्या कारवाईला शासनाकडून स्थगिती

**नंदुरबार,दि.१९ (प्रतिनिधी) - नंदुरबार नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहाच्या देखभाल व परिरक्षणाकरीता नियुक्त श्रीराम सामाजिक, सांस्कृतिक क्रीडा मंडळ नंदुरबार या संस्थेविरुद्ध केलेल्या कारवाईस राज्य शासनाच्या नगरविकास विभागाच्या सहसचिवांनी स्थगिती दिली आहे.**

नंदुरबार शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहावर पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी सील करण्याची कारवाई केली. याबाबत माजी आ. चंद्रकांत रघुवंशी यांनी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडे निवेदनातून नाट्यगृहाची देखभाल व परिरक्षणाकरीता असलेल्या श्रीराम सामाजिक, सांस्कृतिक क्रीडा मंडळ नंदुरबार या संस्थेवर झालेल्या कारवाईबाबत निवेदन दिले आहे. निवेदनाची दखल घेत नगरविकास विभागाच्या सहसचिव विद्या हम्पय्या यांनी मुख्याधिकाऱ्यांनी नाट्यगृहावर केलेल्या कारवाईला स्थगिती दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह ७ जानेवारी रोजी **(पान ४ वर)**

## नंदुरबारच्या तहसिलदार जी.व्ही.एस.पवनदत्ता

नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी)- नंदुरबार नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासकपदी असलेले परिविक्षाधीन अधिकारी जी.व्ही.एस. पवनदत्ता यांची आता नंदुरबार तहसिलदारपदी चार आठवड्यांच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आली आहे. तहसिलदारपदी जी.व्ही.एस. पवनदत्ता यांची २०जानेवारी ते १५ फेब्रुवारीपर्यंत प्रशिक्षणासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. पवनदत्ता हे मागील १५ दिवस प्रशिक्षणानिमित्त नंदुरबार नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक म्हणून काम पाहत होते. आता जी.व्ही.एस. पवनदत्ता हे सोमवारपासून नंदुरबार तहसिलदार पदाचा कार्यभार सांभाळणार आहेत. दरम्यान भारतीय प्रशासन से वे तील परिविक्षाधीन अधिकारी जी.व्ही.एस. पवनदत्ता यांनी नंदुरबार नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक म्हणून काम पाहतांना प्लास्टीक जप्तीची धडाकेबाज मोहीम राबविली.



## नंदुरबारच्या पालकमंत्रिपदी कोकाटे रा.काँ.पदाधिकाऱ्यांकडून स्वागत

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी) - नंदुरबार जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांची नियुक्ती झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.अभिजीत मोरे, लाडकी बहिण योजनेचे अध्यक्ष भरत गावित, महिला जिल्हाध्यक्ष सीमाताई सोनगरे यांनी शिर्डी येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या अधिवेशन स्थळी मंत्री कोकाटे यांची भेट घेतली. तसेच पुष्पगुच्छ देण्यात आले.**

नंदुरबार जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यावर नंदुरबार जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा **(पान ४ वर)**

## मंदाणे यात्रेनिमित्त नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे रक्तदान शिबीर

**मंदाणे, दि.१९ (प्रतिनिधी)- येथील श्री शाकंभरी अष्टभूजा मातेचा यात्रेला नुकतीच सुरुवात झाली आहे. यात्रेत हजारो भाविक हजेरी लावत असून आरोग्य विभागासह विविध सामाजिक, धार्मिक संस्था देखील पुढाकार घेत विविध उपक्रम राबविण्यासाठी सरसावले आहेत. आपणही समाजाचे देणं लागतो हा उद्देश डोळ्यासमोर ठेवत भविष्यात भक्तांसाठी सेवा देता यावी म्हणून नानिजधाम येथील जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे यात्रेचे औचित्य साधत भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले.**



खान्देश सह परराज्यातील कृषकांची व ग्रामस्थांची कुलदैवत असणाऱ्या मंदाणे (ता.शहादा) येथील यात्रेला नुकतीच सुरुवात झाली आहे. त्यानिमित्ताने यात्रेत भाविक मोठया संख्येने हजेरी लावत आहेत. येणाऱ्या भाविकांमध्ये रक्तदानाचे महत्व व्हावे व भविष्यात एखाद्या रुग्णाला रक्ताची आवश्यकता भासल्यास ते रक्तदात्याच्या माध्यमातून सहज उपलब्ध होऊन रुग्णाला जीवनदान मिळावे हा उद्देश ठेवत रक्तदान महान दान म्हणून नानीजधाम येथील जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे रक्तदान शिबीर घेण्यात आले. या संस्थेतर्फे संपूर्ण महाराष्ट्रात ४ ते १९ जानेवारी दरम्यान रक्तदान महायज्ञ सुरू आहे. यानिमित्त मंदाणे येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिरात ११७ रक्तदात्यांनी रक्तदान करत ११७ रक्तकुपिंचे संकलन करण्यात आले. नंदुरबार जिल्ह्यात २५० रक्तकुपि संकलित झाल्या. १६ जानेवारी अखेर जगद्गुरु नरेंद्राचार्य संस्थानाकडून एकूण ९५००० रक्तकुपींचे संकलन झाले असून एक लाख रक्तकुपिंचा संकल्प असून तो पूर्ण करण्याचा निर्धार भक्तगणांनी **(पान ४ वर)**

## धुळे जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते गजाननबापू पाटील यांचे निधन



**धुळे, दि.१९ - तालुक्यातील शिरुड येथील रहिवाशी व जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते गजानन नारायण पाटील उपाख्य गजानन बापू (वय ८१) यांचे रविवारी सकाळी ७:३० वाजता अल्पशः आजाराने निधन झाले. नाशिक येथील एका खाजगी रुग्णालयात गजानन बापू पाटील यांचेवर उपचार सुरु होते. कै.गजानन बापू यांची अंत्ययात्रा सोमवारी (दि.२०) सकाळी अकरा वाजता शिरुड येथील राहत्या घरापासून निघणार आहे.**

अतिशय सामान्य कुटूंबात जन्मलेल्या गजानन बापू यांची ओळख उभ्या **(पान ४ वर)**

**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -73,050 रु.+3% GST
सोने- 24 K -79,800 रु.+3% GST
चांदी- 95,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।



स्व.सौ.रमा विनोद अग्रवाल (मित्तल)
(जन्म ३० ऑगस्ट १९६२ । मृत्यू ९ जानेवारी २०२५)
अपने लिए जो जीते है सभी
परहित के लिए जीना ही जीवन है
दुख दर्द मिटाए जो औरोंका वही रमा रुपी नगीना है
--------: शोकाकुल :--------
अग्रवाल समाज, धुलिया
अग्रवाल महिला मंडळ, धुलिया
अग्रवाल युवक मंडळ, धुलिया
अग्रवाल समाज युवती मंडळ, धुलिया
अग्रवाल मेडिकल सेल, धुलिया
अग्रवाल सहाय्यक मंडळ, धुलिया

भावपूर्ण श्रद्धांजली



स्व.सौ.रमादेवी विनोद अग्रवाल
(मृत्यू दि.०९/०१/२०२५)
आपल्या पावन स्मृतिस विनम्र श्रद्धांजली!
--------: श्रद्धावनत्:--------
कार्यकारी मंडळ व समस्त सभासद
श्री महाराजा अग्रसेन
ज्येष्ठ नागरिक संघ, धुळे

।। भावभिनी श्रद्धांजली ।।



स्व.सौ.रमा विनोद अग्रवाल (मित्तल)
(जन्म ३० ऑगस्ट १९६२ । मृत्यू ९ जानेवारी २०२५)
जीवन के हर मोड पर साथ निभाया था
परिवार के हर सुख दुख मे हाथ बटाया था
धार्मिक, सामाजिक हर क्षेत्र में अग्रणी पाया था
जाने अनजाने सभी को स्नेह से अपना बनाया था..!
-: पगडी रस्म :-
सोमवार २०/१/२०२५ दोपहर ४ बजे
स्थल : छत्रपती अग्रसेन हॉल (डोम), नदीकिनारे, धुलिया
--------: शोकाकुल :--------
पुरुषोत्तम सागरमल अग्रवाल — ताराचंद सागरमल अग्रवाल
अशोक मुरलीधर अग्रवाल — विनोद प्रभुदयाल अग्रवाल
गिरीष प्रभुदयाल अग्रवाल
दिपक, अतुल, विक्रम, प्रणव, तुषार, मितुल,
राधेश्याम, श्रीकिशन, महावीर, ओमप्रकाश, शरद
एवं समस्त मित्तल परिवार
फर्म : मे प्रभूदयाल सागरमल अग्रवाल
श्रीकृष्ण खांडसारी शुगर मिल्स लि. तळोदा
टॉपलाईन फुड्स, टॉपलाईन रिसॉर्ट, गणेश एंटरप्राईजेस, धुलिया

# आपला महाराष्ट्र

# उद्योग तिकडे आणि बिबटे ईकडे

महाराष्ट्रातील मोठे उद्योग गुजरात मध्ये गेल्याच्या अनेक बातम्या यापूर्वी आपण वाचल्या आहेत, ऐकल्या देखील आहेत. केंद्रात आणि राज्यात डबल इंजिन सरकार असल्यामुळे केंद्राची जशी इच्छा असेल तसे महाराष्ट्रातील सरकारला वागणे भाग आहे. म्हणून केंद्राला जर वाटले की गुजरात मध्ये महाराष्ट्रात लागणारे उद्योग स्थलांतरित झाले पाहिजेत तसे ते होत आले आहेत. विरोधी पक्षानी त्याविषयी टिपणी केली किंवा चर्चा केली तरी सत्तारूढ सरकार त्या आरोपांना किंवा टीकेला प्रत्युत्तर देत उद्योग स्थलांतरांचे समर्थन करतात. एकंदरीत गुजरातचा विकास व्हावा आणि मुंबई या आर्थिक राजधानीतून गुजरात कडे आर्थिक ओघ जात राहावा यासाठी मुंबई –आमदाबाद बुलेट ट्रेनची व्यवस्था करण्यात आली असून त्या रेल्वे मार्गाचे काम प्रगती पथावर आहे. आता परदेशी पाहुणे देखील मुंबईत न जाता अहमदाबाद मध्ये जातात. मात्र त्याचवेळी गुजरात मध्ये ज्याचा उपद्रव आहे ते महाराष्ट्राकडे पाठविण्याचे उद्योग तिथली सरकारी यंत्रणा करते. त्यासंबंधीची एक गंभीर घटना नुकतीच उघडकीस आली आहे. गुजरातच्या वनखात्यातील अधिकाऱ्यांच्या डोक्यात एक अफलातून कल्पना आली. गुजरातच्या जंगलात जे बिबटे आहेत त्यांचा उपद्रव लोकांना होत असल्यामुळे आणि त्यांची जनावरे बिबटे फस्त करीत असल्यामुळे ते पकडून महाराष्ट्रात आणून सोडण्याची शक्कल त्यांनी लढविली. बिबटे पकडून जर ते हम रस्त्याने पिंजऱ्यातून आणून महाराष्ट्रात सोडले तर आपण पकडले जाऊ या भीतीमुळे त्यांनी बिबट्याचे पिंजरे होडीत घालून सरदार सरोवराच्या जलाशयातून आणून महाराष्ट्राच्या म्हणजेच नंदुरबार जिल्ह्याच्या हद्दीत असलेल्या आदिवासी भागात बिबट्यांना सोडण्याचा प्रयतक केला. परंतु तेथील रहिवास असलेल्या आदिवासी बांधवांच्या लक्षात ही बाब आल्यामुळे त्यांनी वनखात्याच्या होडीतून त्याचे पिंजरे काठावर आणण्याचा कार्यक्रम थांबवला. अखेरीस गुजरातच्या वनखात्याच्या अधिकाऱ्यांना माघार घ्यावी लागली आणि त्यांनी होडी परत नेली. अशाप्रकारे हा संभाव्य धोका टळला. जर आदिवासी बांधवांना होडी दिसली नसती तर चुपचाप गुजरातच्या वन अधिकाऱ्यांनी बिबटे महाराष्ट्रात आणून सोडले असते. एकदा ही चोरी पचली की नंतर गुजरात मध्ये जेवढे बिबटे असतील तेवढे महाराष्ट्रात सोडण्याची नामी योजना अमलात आली असती. त्या बिबट्यांनी आपल्या आदिवासी भागातील लोकांना उपद्रव निर्माण केला असता, बिबट्याने धुमाकूळ घालून माणसांना आणि त्यांच्या जनावरांना पकडून मारले असते. केवळ आदिवासींच्या सजगतेमुळे गुजरातच्या वनखात्याचा प्रयोग फसला. यावर महाराष्ट्रातील वनखात्याने चौकशी करण्याची आणि गुजरातच्या वनखात्याला तोंडावर पाडण्याची व्यवस्था केली पाहिजे. जेणेकरून तिथले अधिकारी पुन्हा असले उद्योग करणार नाहीत.

महाराष्ट्रातील विकासाची साधने अर्थात मोठे उद्योग गुजरात मध्ये नेऊन तो प्रदेश समृद्ध करायचा आणि तिथले जे काही उपग्रह मूल्य असतील ते महाराष्ट्रात पाठवण्याचे उद्योग करायचे आणि महाराष्ट्राला अडचणीत आणायचे हे मोठे षडयंत्र दिसते. याची दखल महाराष्ट्राच्या वनमंत्र्यांनी आणि अधिकाऱ्यांनी घेतली पाहिजे. आधीच महाराष्ट्रातील राखीव जंगलात आणि बिगर राखीव जंगलात बिबट्यांचा वावर वाढला असून ते मानवी वस्तीत येऊन धुमाकूळ घालतात. आपल्याकडे धुळे जिल्ह्यात म्हसदी ते लळींग किल्ल्याच्या आसपासच्या जंगलापर्यंत डझनावारी बिबटे वावरताना दिसतात. मागे बोरकुंडच्या जंगलात म्हणजे शेतात बिबट्याने लहान मुलांवर हल्ले केले होते. मुले त्या हल्ल्यात ठार झाली. बकऱ्या आणि मेंढ्या मोठ्या प्रमाणावर बिबट्यानी फस्त केल्या. लोकांनी ओरड केल्यामुळे वन खात्याने पिंजरे लावून ते बिबटे पकडले आणि पुन्हा त्यांना जंगलात सोडले. ते कुठल्या जंगलात सोडले त्याची माहिती कोणाला कळलेली नाही. तिकडे तापी पलीकडे अक्कलकुवा तळोदा तालुक्यातील जंगले संपल्यामुळे तेथील बिबटे मनुष्य वस्तीत घुसतात. दहशत निर्माण करतात. पुन्हा वनखात्याचे काम वाढते. ते बिबट्यांना पकडतात आणि कुठे सोडून देतात कळत नाही. कदाचित गुजरातचे वन अधिकारी जो खेळ खेळतात तोच खेळ महाराष्ट्रातील वनखाते करीत असावे. जोपर्यंत हा खेळ दृष्टीस पडत नाही तोपर्यंत चालू असावा. म्हणजे इकडचे संकट तिकडे आणि आजचे मरण उद्यावर ढकलण्याची ही पद्धत आहे. तिकडे विदर्भातील राखीव जंगलातून बाहेर पडून हम रस्त्यावर वाहनांच्या धडकेने बिबट्या ठार झाल्याची बातमी अधून मधून येतच असते. गेल्या महिन्यात सहा ते सात बिबटे ठार झाल्याच्या बातम्या आलेल्या आहेत. प्राथमिक अंदाजानुसार बिबट्याचे बछडे उपासमारीमुळे मृत्युमुखी पडल्याचे सांगण्यात आले आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे की आपल्याकडील वन खात्याची यासंबंधीची अनास्था फार मोठी आहे. या जनावरांची ते फार काही चिंता करीत नाहीत असे दिसते. अगदी अभयारण्यात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांचा वाघ किंवा तत्सम हिंसक जनावरांशी चाललेला छळ हे देखील बातमीचे विषय होतात. या बातम्यांची दखल आपणहून उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय घेते. त्यावर ताशेरे ओढते पण वन खाते ढिम्म हलत नाही. इतकी अनास्था देशात अन्यत्र किंवा देशाबाहेर अन्यत्र कुठेही दिसत नाही.

आपल्या वेदांमध्ये जिवो जीवश्च्य जीवनम्‌ असे म्हटले आहे. याचा अर्थ एका जीवावर दुसऱ्या जीवाचे जगणे अवलंबून आहे. पण माणसाला असे वाटते की, हे सगळे जीव हे माझ्याच साठी जन्माला आले आहेत. मात्र एकमेकांवर अवलंबून असलेली नैसर्गिक जी प्रक्रिया आहे त्यात सहजीवनाची व्यवस्था आहे. जंगलाचा कायदा मात्र वेगळा असतो. जो ताकदवान असतो तोच जंगलात जगतो. त्यासाठी सर्वायव्हल ऑफ द फिटेस्ट अशी म्हण तयार झालेली आहे. व्याघ्र प्रकल्पात अनेक वन्यजीव असतात, हरणांचे कळपचे कळप असतात. त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम वाघांचे असते. जर ते झाले नाही तर हरणे जंगलात घुसून शेतीचा नाश करतात. म्हणून हरणे जेवढी गरजेची आहेत तेवढेच बिबटे आणि वाघ गरजेचे असतात. त्यामुळे जंगलातील संतुलन कायम राहते. आणि मनुष्य वस्तीला त्याचा त्रास उद्भवत नाही. अशी ती रचना असते. महाराष्ट्रात ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर जिल्ह्यात आहे, उमरेड क–हांडला वन्यजीव अभयारण्य आहे. हे अभयारण्य पैनगंगा नदीच्या खोऱ्यात असून. त्याच प्रकारचे अभयारण्य पेंच नदी प्रकल्पाच्या परिसरात आहे. तिथेही वाघांचा आणि बिबट्यांचा अधिवास आहे. नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती,बोर अभयारण्य वर्धा जिल्हा आणि सह्याद्री व्याघ्र प्रकल्प आहे. हे सर्व प्रकल्प मिळून ४४४ वाघ महाराष्ट्रात असल्याची नोंद आहे. तर बिबट्यांची संख्या महाराष्ट्रात जवळपास १९८५ एवढी आहे. ही संख्या राखीव अधिवासातील आणि बिगर राखीव जंगलातील असावी. देशात जी बिबट्यांची संख्या आहे त्यात मध्य प्रदेशात सर्वाधिक म्हणजे सुमारे ४००० बिबटे आहेत. दुसरा क्रमांक महाराष्ट्राचा असून तिसऱ्या क्रमांकावर कर्नाटक आहे. या तिन्ही राज्यात बिबट्यांचे साम्राज्य सातत्याने वाढत असून जंगले कमी झाल्यामुळे त्यांची मनुष्यवस्तीत सतत घुसखोरी चालू असते. असे असताना गुजरात मधील बिबटे महाराष्ट्रात आणून सोडण्याचे उद्योग जर तिथली शासकीय यंत्रणा करीत असेल तर यासारखी गंभीर गोष्ट दुसरी असू शकत नाही. घरचे झाले थोडे आणि व्याह्याने धाडले घोडे अशातला हा प्रकार आहे. त्यातल्या त्यात नंदुरबार जिल्ह्यातील नर्मदा आणि तापी यांच्या मध्य खोऱ्यात असलेला सातपुडा जंगल नसले तरी वन्य प्राण्यांसाठी अनुकूल आहे. त्याचा गैरफायदा घेण्याचा प्रयतक गुजरात करीत आहे. त्याची दखल महाराष्ट्राने घेतली पाहिजे.



## स्वेस उर्दू हायस्कूल व मो.उस्मान मराठी शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**धुळे, दि.१९- स्वेस उर्दू व हाजी मोहम्मद उस्मान मराठी शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन व निरोप समारंभाचे आयोजन हाजी अखलाक अहेमद यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आमदार फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आले.**

प्रमुख पाहुणे म्हणून फैसल अहमद चेअरमन (ए.आ.टी.), विश्राम बिरारी (माजी मुख्या. महाजन शाळा), हाजी अब्दुल रऊफ देशमुख, अबुल कलाम, निहाल अहेमद ज़मीर मुल्ला, अब्दुल रशीद महेमुद, डॉ.अशफाक, इमरान (मुख्या, आर.एम. पटेल), शम्सुलहसन मुख्या. (इस्लाहुलबनात) अब्दुल रशीद हमीद जमीर, संस्था संचालक हाजी अफ्फान, जाहिद हुसेन भैया, अनीस भैय्या, जफर भैय्या, मुख्याध्यापिका चाहत मॅडम, सुफिया मॅडम, आलिया मॅडम, नसीम मॅडम तसेच परिवेक्षक अब्दुल लतीफ आणि अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते. यावेळी जहॉआरा शाहिद मलिक (नवनिर्वाचित सरकारी वकील) तसेच अतुफा अनिस अहमद (गोल्ड मेडलिस्ट) व अबुल कलाम यांच्या विशेष कामगिरीबद्दल माजी आमदार शाह यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. सूत्रसंचालन इस्माईल सर व खालीक सर यांनी केले तसेच आभार वसीम सरांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रिजवान सर, जावीद सर, इमरान सर, वसीम सर, रईस यांनी अथक परिश्रम घेतले.

## कमलाबाई शं. कन्या शाळेत गाईड कॅम्प संपन्न
## विद्यार्थीनींकडून विविध प्रात्यक्षिकांचे सादरीकरण

**धुळे, दि.१९- येथील स्त्री शिक्षण संस्थेच्या कमलाबाई शं. कन्या शाळेत नुकताच इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींचा एक दिवसीय गाईड कॅम्प घेण्यात आला.**



कार्यक्रमात विद्यार्थिनींनी त्यांच्या गाईड शिक्षिकांच्या मदतीने विविध प्रात्यक्षिके सादर केली. यात तंबू बनविणे, प्रथमोपचार, ध्वजारोहण, विविध गाठी बनविणे, बंधने आणि स्ट्रेचर तयार करणे, विविध गॅझेट तयार करणे, तसेच बिन भांड्यांचा स्वयंपाक तयार करणे इत्यादी प्रात्यक्षिके सादर केली. त्यानंतर मुख्याध्यापिका सौ.मनीषा जोशी तसेच सर्व पर्यवेक्षिका यांच्या उपस्थितीत शेकोटीचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यानंतर विद्यार्थिनींनी काही सांस्कृतिक कार्यक्रमे सादर केली. सूत्रसंचालन सौ.स्मिता उपासनी यांनी केले. कार्यक्रमाला गाईड ऑफिस धुळे, येथील ज्ञानेश्वर सावंत व जयवंत आसोले हे देखील उपस्थित होते. गाईडच्या नियमानुसार संघभावना विकसित व्हावी, यासाठी विद्यार्थिनींनी संघ निहाय विविध प्रकारचे पराठे आणि गाजराचा हलवा तयार करून आणण्याची स्पर्धा देखील आयोजित केली होती. स्पर्धेचे परीक्षण शाळेच्या शिक्षिका सौ.हेमलता धर्माधिकारी, सौ.नीता सैंदाणे, सौ.सुषमा वसावे आणि श्रीमती स्मिता पवार यांनी केले. त्यात प्रथम क्रमांक इयत्ता १० ग ब्रह्मकमळ संघ, द्वितीय क्रमांक इयत्ता १० इ कमळ संघ आणि तृतीय क्रमांक इयत्ता १० ब चंपा संघ, यांना मिळाला. गाईडचा कॅम्प यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, सर्व पर्यवेक्षिका यांनी मार्गदर्शन केले. तसेच सर्व गाईड शिक्षकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मेहनत घेतली.

## एलसीबीने मद्य तस्करी रोखली; वाहनासह सोळा लाखांचा मुद्देमाल जप्त

**धुळे, दि.१९- शहर हद्दीतून होणारी लाखोंची मद्यतस्करी एलसीबीने काल पहाटे उधळून लावली. कहर म्हणजे जनरेटरच्या रिकाम्या आवरणमध्ये विदेशी मद्याचे बॉक्स लपवून ही वाहतूक केली जात होती. या कारवाईत आयशर वाहनासह एकूण १६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**



दमन येथून धुळेमार्गे गुजरात राज्यात आयशर वाहनाद्वारे विदेशी मद्याची वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती एलसीबीचे पीआय श्रीराम पवार यांना मिळाली होती. त्यानुसार पीआय पवार यांनी पथकाला कारवाई करण्याबाबत आदेशित केले. पथकाने सुरत बायपासवर खान्देश कॅन्सर सेंटर समोरील महामार्गावर दुपारी नाकाबंदी केली. दुपारी १२ वाजेच्या सुमारास संशयित आयशर (एमएच १७/ बीवाय १०५२) वाहन येताना दिसले. पोलिसांनी सदर वाहन थांबविले. चालकाला त्याचे विचारले असता त्याने विकाससिंग नगेंद्रसिंग चौहान (२६), रा. रुम नं.१३, धर्मेशभाईकी चाळ, भिमपौर, दमण असे सांगितले. तसेच सदर वाहनात कमिन्स कंपनीचे जनरेटर असून ते गुजरात राज्यात घेवून जात असल्याचे सांगत पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पथकाने जनरेटरची बारकाईने तपासणी केली असता आतील पोकळ भागात विविध कंपनीची विदेशी दारू, रम व बिअर बाटल्यांचे बॉक्स मिळून आले. एकूण १३० बॉक्समध्ये ४ लाख १७ हजार ६०० रुपयांचा हा मद्यसाठा आढळून आला. त्यामुळे पथकाने १२ लाखांच्या आयशर वाहनासह एकूण १६ लाख १७ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर विदेशी मद्याला केवळ दादरा व नगर हवेली येथेच विक्री करण्याचा परवाना आहे. महाराष्ट्रातून या मद्याची वाहतूक किंवा पुरवठा करण्याची शासनाची कोणतीही परवानगी नाही. असे असताना शासनाची फसवणूक करुन महाराष्ट्रात विक्री करण्याच्या उद्देशाने चोरटी वाहतूक केली जात होती. याप्रकरणी धुळे शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया दुपारी उशीरापर्यंत सुरु होती.सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, असई संजय पाटील, पोहेकॉ पंकज खैरमोडे, पवन गवळी, आरीफ पठाण, शशिकांत देवरे, मुकेश वाघ, पोकॉ मयुर पाटील, सुशिल शेंडे, हर्षल चौधरी यांच्या पथकाने केली.




## देवपूरमधील महिला सदनतर्फे तिळगुळ समारंभ उत्साहात साजरा

**धुळे, दि.१९- येथील त्रिविक्रम मंगल कार्यालयात मकर संक्रातीनिमित्त तिळगुळ समारंभ उत्साहात साजरा करण्यात आला.**

महिला सदन अध्यक्षा श्रीमती वीणा चौधरी यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रास्तविकात महिला सदनतर्फे गेल्या दोन वर्षात जे विविध कार्यक्रम झाले आणि उपक्रमाच्या माध्यमातून लोप पावत जाणाऱ्या भारतीय संस्कृतीतील जात्यावरच्या ओव्या, भुलाबाईची गाणी इत्यादीला उजाळा देण्याचा प्रयत्न झाला त्याची दखल पुण्यातील एका कार्यक्रमात घेण्यात आल्याचे सांगितले. काळ्या साड्या आणि मोत्याचे दागिने घालून आलेल्या सुमारे ४० ते ४५ महिला एकमेकीचे कौतुक करत नाच गाण्यात तल्लीन झाल्या होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्षा वीणा चौधरी सह सचिव शारदा धांडे, सहसचिव अमिता झेंडे, विजया झेंडे, भारती महाले, माधुरी बडगुजर, ज्योती भावसार, हिरा खंदलकर, दिपा वानखडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास मिरा देव, सुमन चांडक, शोभना पाटील, सुनिना झेंडे, शोभा पाटील, मिनाक्षी जोशी, जयश्री कापडी, विद्या खैरनार, मंगला बागुल, उज्वला भदाणे, हर्षा कुळकर्णी, अलका चौधरी, अनिता चौधी, आरती महाले, शिल्पा चौधरी, मंदा चौधरी, इत्यादी अनेक महिला उपस्थित होत्या.

## समाजोपयोगी साहित्याबद्दल सुरेश थोरात सन्मानित



धुळे, दि.१९- येथील सार्वजनिक बांधकाम विभागातून सेवा निवृत्त झालेले, सुवर्णकार समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, लेखक, कवी सुरेश चुनिलाल थोरात यांना समाजोपयोगी लेखन साहित्य निर्मितीबद्दल सन्मानित करण्यात आले. मराठी पत्रकारितेचे जनकआचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त सुरेश थोरात यांना सदर संस्थेचे संस्थापक अध्यक्षगुरुनाथ म.तिरपणकर तसेच संस्थेच्या सचिव संचिता भंडारी यांच्या हस्ते सन्मानपत्र बहाल करुन सन्मानित करण्यात आले. थोरात यांना सन्मानपत्र प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले जात आहे.



## मोफत आरोग्य शिबीरास प्रतिसाद

धुळे, दि.१९- आज रविवारी येथील सेवा सुपर स्पेशलिटी अँड क्रिटिकल केअर सेंटर येथे मूत्ररोग संबंधी मोफत आरोग्य शिबीर संपन्न झाले. डॉ.आशिष छाजेड यांनी रुग्णांना मोफत मार्गदर्शन व तपासणी केली. शिबिरात काही रुग्णांची सोनोग्राफी तपासणी करण्यात आली. या रुग्णांपैकी काही रुग्णांना पुढील मोफत उपचारासाठी दाखल करून घेण्यात येणार आहे. सदर शिबिराला उदंड प्रतिसाद मिळाला असून आरोग्य शिबिर यशस्वी होण्यासाठी हॉस्पिटलचे संचालक डॉ.राजेश अग्रवाल, डॉ.कुणाल मेहता, डॉ.प्रशांत एम पाटील, डॉ.प्रशांत जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## ढगाळ हवामान हटेना

धुळे- शहरासह जिल्ह्यात ढगाळ वातावरण हटण्याची चिन्हे दिसत नाहीत. परिणामी थंडी जणू गायब झाली आहे. विशेषत: मध्यरात्रीनंतर पहाटेपर्यंतच थंडी जाणवत आहे. दिवसा उकाडा वाढला आहे. लहरी हवामानाचा फटका बसल्यामुळे रुग्ण संख्याही वाढत आहे. दवाखान्यांमध्ये पेशंट वाढले आहेत.

## जाहीर नोटीस

**तमाम जनता, बँका, पतसंस्था, वित्तीय संस्था इत्यादी यांना जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,**

**मौजे निमडाळे ता. धुळे जि. धुळे येथील गट नं. ४२९/२ चे एकूण क्षेत्र २ हेक्टर ०० आर. आकार ४ रु.०० पैसे यासी चतु:सिमा मंजूर नकाशाप्रमाणे.**

**येणे प्रमाणे वर्णनातील शेतजमीन १)श्री. गौतम पंडितमोहिते रा. निमडाळे ता. जि. धुळे, २) श्री. उत्तम पंडित मोहिते, ३) श्री. दाजभाऊ पंडित मोहिते, ४) मंगलाबाई शशिकांत बच्छाव ५) लताबाई मगन लोंढे, ६) वत्सलाबाई पंडित मोहिते यांच्या सामाईक मालकीचे व कब्जे उपभोगातील असून यांचे कडून आमचे अशिल यांनी कायम स्वरूपी विकत घेण्याचा सौदा करार केलेला आहे. बयाणा रक्कम अदा केलेली आहे. तरी वरील शेतजमीनी संबंधी कोणाची खरेदी, विक्री, गहाण, बक्षिस, टाच, जप्ती, कुठल्याही प्रकारचा बँक बोजा, वारसा हक्क, वहिवाट हक्क, वाटणी हक्क, जनरल मुख्यत्यार अधिकार, सौदा पावती वरील सौदा पावती, करारनामा वगैरे इतर कुठलेही कायदेशीर हस्तांतरीत व्यवहार असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत लेखी तक्रार खालील दिलेल्या पत्त्यावर कळविण्यात याव्यात तसेच प्रत्यक्ष मुळ कागदपत्र दाखवून आमचे अशिलांची खात्री करुन द्यावी. मोबाईल द्वारे, पोस्टाने अथवा परस्पर वर्तमानपत्राद्वारे घेण्यात येणाऱ्या हरकती अथवा तक्रारी आमच्या अशिलांवर तसेच वरील शेतजमीनीवर बंधनकारक राहणार नाही.**

**येणेप्रमाणे पक्षकाराने दिलेल्या माहितीनुसार आमचे मार्फत जाहीर नोटीस असे.**

**ॲड. अमित अशोक वाघ**
प्लॉट नं. २२, श्रीराम वाटीका, मधुबन कॉलनी, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे
मो. नं. ९८२३१३६००७

## जाहीर नोटीस

**तमाम जनता, बँका, पतसंस्था, वित्तीय संस्था इत्यादी यांना जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,**

**मौजे वलवाडी ता. धुळे जि. धुळे येथील सर्व्हे नं. ११४/२ यातील प्लॉट नं. ११चे एकूण क्षेत्र १९८ चौ. मी. यामधील पश्चिमेकडील भागाचे निम्मे क्षेत्र ९९ चौ. मी. यामध्ये बांधीव मिळकत (रो–हाऊस) चे क्षेत्र मंजूर म.न.पा.नकाशा प्रमाणे असून यासी चतु:सिमा मंजूर ले आऊट प्रमाणे.**

**येणे प्रमाणे वर्णनातील मिळकत १) श्री. वसंत रोहिदास मोरे, रा. सिद्धार्थ नगर चितोड रोड, धुळे, २) श्री. समाधान परमेश्वर पाटील रा. नकाणे रोड, देवपूर धुळे यांच्या सामाईक मालकीचा व कब्जे उपभोगातील असून यांचे कडून आमचे अशिल यांनी कायम स्वरुपी विकत घेण्याचा सौदा करार केलेला आहे. बयाणा रक्कम अदा केलेली आहे. तरी वरील मिळकतीसंबंधी कोणाची खरेदी, विक्री, गहाण, बक्षिस, टाच, जप्ती, कुठल्याही प्रकारचा बँक बोजा, वारसा हक्क, वहिवाट हक्क, वाटणी हक्क, जनरल मुख्यत्यारअधिकार, सौदा पावती वरील सौदा पावती, करारनामा वगैरे इतर कुठलेही कायदेशीर हस्तांतरीत व्यवहार असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत लेखी तक्रार खालील दिलेल्या पत्त्यावर कळविण्यात याव्यात तसेच प्रत्यक्ष मुळ कागदपत्र दाखवून आमचे अशिलांची खात्री करुन द्यावी. मोबाईल द्वारे, पोस्टाने अथवा परस्पर वर्तमानपत्राद्वारे घेण्यात येणाऱ्या हरकती अथवा तक्रारी आमच्या अशिलांवर तसेच वरील मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.**

**येणेप्रमाणे पक्षकाराने दिलेल्या माहितीनुसार आमचे मार्फत जाहीर नोटीस असे.**

**ॲड. अमित अशोक वाघ**
प्लॉट नं. २२, श्रीराम वाटीका, मधुबन कॉलनी, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे
मो. नं. ९८२३१३६००७



















# विद्यार्थ्यांनी ज्ञानाचा उपयोग उपेक्षितांसाठी करावा : पाटील

**साक्री, दि.१९ (प्रतिनिधी)- आदिवासी समुदायातील शिक्षित विद्यार्थ्यांनी आपल्याला अवगत झालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील सर्व घटकांसाठी करावा. राज्य शासन तसेच केंद्र शासनाने सुरू केलेल्या विविध विकास योजनांची माहिती समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावेत असे मत विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजीत सुरेश पाटील यांनी व्यक्त केले.**



विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियाना अंतर्गत आयोजित ट्रायबल कम्युनिटी डेव्हलपमेंट प्रोग्राम कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे उपस्थित होते. प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे, कार्यशाळेचे वक्ते डॉ.मोहन पावरा, डॉ.खुमानसिंग वळवी, उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील, कार्यशाळेचे समन्वयक प्रा विलास पावरा उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे यांनी व्यक्त केले. कार्यशाळेचा समारोप प्राचार्य डॉ.लहू पवार यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्ष प्राचार्य डॉ.अहिरे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील उपस्थित होते. संचालन प्रा.विलास पावरा व आभार प्रदर्शन प्रा.मुकेश वळवी यांनी तर समारोप कार्यक्रमाचे संचालन प्रदीप राठोड तर आभार प्रा.राजू देवकर यांनी केले. कार्यशाळेत १०० आदिवासी विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.


## CHANGE NAME

My Old Name Was
**FARIDA JUJAR BOHARI**
And My New Name Is
**FARIDA JUZAR BOHARI**
Add:- Venkatesh Colony, Plot No. 19, Mandal, Tal : Shirpur Dist - Dhule


## टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या टायटल व्हेरिफिकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : तु. जि. धुळे पो.तु.व ता.धुळे पैकी मौजे महिंदळे येथील महानगर पालिका हद्दीतील स. नं. १०६/२ड पैकी प्लॉट नं. ०२ चे एकूण क्षेत्र १५०.०० चौ. मी. बखळ प्लॉट

यासी चतु:सिमा खालील प्रमाणे

पुर्वेस : प्लॉट नं. ०७ — पश्चिमेस : ०६ मी. रस्ता
दक्षिणेस : प्लॉट नं. ०३ — उत्तरेस : प्लॉट नं. ०१

येणे प्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे पक्षकार रेखा बापू शिरसाठ व नितेश बापू शिरसाठ रा. दशक,जेल रोड, नाशिक यांनी मिळकतीचे मालक निलेश प्रकाश पाटील व प्रकाश दगा मोरे रा. धुळे यांचेशी केलेला आहे. तरी सबब तमाम लोकांना या टायटल व्हेरिफिकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. ०७ दिवसानंतर आलेल्या हरकती,लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही,तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे.

सदरची टायटल व्हेरिफिकेशन नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. १८/०१/२०२५

**ॲड. मंगेश बी. सोनवणे**
ऑफिस : एस.२, गुरुदत्त संकुल जमनागिरी रोड, धुळे
मो. ७५८८१२७४७७/९४०४७३६७९६

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो.ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ०८/२०२४
नि. नं. ६/ड चौ. ता. १३/०२/२०२५

**१) सायजीबाई तुळशिराम पावरा, २) शामलाल तुळशिराम पावरा,**
**३) आमलाल तुळशिराम पावरा** सर्व रा. चिलारे ता. शिरपूर जि. धुळे.... अर्जदार

।।विरूध्द।।

कोणीही नाही ... जाबदेणार
**तुळशिराम सुरज्या पावरा,** मयताचा पत्ता : चिलारे, ता. शिरपूर जि. धुळे
मृत्यू ता. १०/०८/२००९ .... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांचे पती, अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील नामे तुळशिराम सुरज्या पावरा हे दि. १०/०८/२००९ रोजी मौजे चिलारे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं. १ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे. न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की,तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. १३/०२/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधींमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही. असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर, शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** — कोर्टाचा शिक्का — **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर — दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो.ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ९/२०२४
नि. नं. ६ चौ. ता. १३/०२/२०२५

**१) लिलाबाई सिताराम पावरा, २) मधुराव सिताराम पावरा,**
**३) दिलीप सिताराम पावरा ४) सुनिताबाई देविदास पावरा,**
सर्व रा. चिलारे ता. शिरपूर जि. धुळे .... अर्जदार

।।विरूध्द।।

कोणीही नाही ... जाबदेणार
**सिताराम लाला पावरा,** मयताचा पत्ता : चिलारे, ता. शिरपूर जि. धुळे
मृत्यू ता. २९/१०/२०२४ .... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ व ४ यांचे वडील नामे सिताराम लाला पावरा हे दि. २९/१०/२०२४ रोजी मौजे चिलारे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं. १ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशनच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे. न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की,तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. १३/०२/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधींमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही. असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर, शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** — कोर्टाचा शिक्का — **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर — दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

निशाणी नं.६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो.ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. २८/२०२५

**१) दादाभाई रामदास भिल,** रा. तऱ्हाडी त. त. ता. शिरपूर जि. धुळे
२) विमलबाई नाना भिल, (मयत) मयतास वारस
२-अ) रमेश नाना भिल रा. तऱ्हाडी त.त. ता. शिरपूर जि. धुळे
३) आक्काबाई शत्रुघ्न भिल रा. तऱ्हाडी त. त. ता. शिरपूर जि. धुळे
४) विजुबाई मंगा भिल रा. कोंढावळ ता. शहादा जि. नंदुरबार .... अर्जदार

।।विरूध्द।।

कोणीही नाही ... जाबदेणार

X

**कै. सुपाबाई रामदास भिल ,** (मृत्यू ता. १७/०७/२००९)
रा. ममाणे पो. तऱ्हाडी ता. शिरपूर जि. धुळे.
.... मयत

ज्याअर्थी मयत सुपाबाई रामदास भिल ह्या दि. १७/०७/२००९ रोजी मौजे ममाणे पो. तऱ्हाडी ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाल्या असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ चे कलम २ अन्नवे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय तसेच औपचारिक कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. १८/०२/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरककत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही. असे समजण्यात येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. ७/१/२०२५
सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** — कोर्टाचा शिक्का — **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे — दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

निशाणी नं.६/ड

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो.ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ३२/२०२५

**१) सीमादेवी विजयकुमार यादव, २) शुभम विजयकुमार यादव**
**३) विशाखा विजयकुमार यादव, ४) शिवानी विजयकुमार यादव**
सर्व रा. पळासनेर ता. शिरपूर जि. धुळे .... अर्जदार

।।विरूध्द।।

कोणीही नाही ... जाबदेणार

X

**कै.विजयकुमार परशराम यादव ,** (मृत्यू ता. २६/१०/२०२४)
मयताचा पत्ता : पळासनेर ता. शिरपूर जि. धुळे. .... मयत

ज्याअर्थी मयत विजयकुमार परशराम यादव हे दि २६/१०/२०२४ रोजी मौजे पळासनेर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ चे कलम २ अन्नवे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय तसेच औपचारिक कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. २१/०२/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता हजर होवूनन हरककत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही. असे समजण्यात येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. ७/१/२०२५
सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** — कोर्टाचा शिक्का — **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे — दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

निशाणी नं.६

**शिरपूर येथील मे. दिवाणी जज्ज सो. ज्युडी. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. १६/२०२५

**१) श्रीमती निर्मलाबाई भास्करराव भदाणे (पाटील) वगैरे** .... अर्जदार

।।विरूध्द।।

कोणीही नाही . जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ हे कै. भास्करराव साहेबराव भदाणे (पाटील) यांचे कायदेशीर वारस असून त्यांचा मृत्यू ता. १८/१०/२०२४ रोजी पिळोदा ता. शिरपूर जि. धुळे येथे झाला आहे. अर्जदार आणि मयत हे पिळोदा ता. शिरपूर जि. धुळे येथील राहणारे असून मयताचे अर्जदार हे अनुक्रमे पत्नी,मुली व मुलगा असे वारस आहेत म्हणून अर्जदार भास्करराव साहेबराव भदाणे (पाटील)यांचे वारस असून अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असलेले अर्जदार नं. १ ते ५ यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी /वारसांचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज केला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदार नं. १ ते ४ यांचे व्यतिरिक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांच्या आत अगर दि. १७/०२/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधींमार्फत हजर राहून लेखी स्वरुपात हरकती सादर करावे अन्यथा सदरील अर्जदार नं. १ ते ४ यांचा तोंडी पुरावा घेवून त्याआधारे अर्जदार नं. १ ते ४ यांचे व्यतिरिक्त दुसरे कोणीच मयताचे वारस नाहीत, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार नं. १ ते ४ यांना मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. न्यायाधीश सो. क. स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

आज रोजी माझ्या सहीनी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** — कोर्टाचा शिक्का — **सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर — दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो.ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. २६/२०२५
नि. नं. ६ चौ. ता. १७/०२/२०२५

**१) दरबारसिंग भिमसिंग राजपूत,** रा. अहिल्यापूर ता. शिरपूर जि. धुळे
**२) मनिषाबाई कैलास राजपूत,** रा. कळमसरे ता. शिरपूर जि. धुळे
**३) भिकूबाई मोतीलाल गिरासे,** रा. वणी ता. शिंदखेडा जि. धुळे.... अर्जदार

।।विरूध्द।।

कोणीही नाही ... जाबदेणार
**दुर्गाबाई दरबारसिंग राजपूत,** मयताचा पत्ता : अहिल्यापूर, ता. शिरपूर जि. धुळे
मृत्यू ता. ०३/०१/२०२० .... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांची पत्नी, अर्जदार नं. २ व ३ यांची आई नामे दुर्गाबाई दरबारसिंग राजपूत ह्या दि. ०३/०१/२०२० रोजी मौजे अहिल्यापूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेल्या आहेत. मयतास अर्जदार नं. १ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे. न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की,तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. १७/०२/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधींमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही. असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर, शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** — कोर्टाचा शिक्का — **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर — दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

निशाणी नं.६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो.ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ३३/२०२५

**१) रतीलाल नारसिंग पावरा, २) विजय नारसिंग पावरा**
**३) सखाराम नारसिंग पावरा,**
सर्व रा.भोईटी ता.शिरपूर जि.धुळे .... अर्जदार

।।विरूध्द।।

कोणीही नाही ... जाबदेणार

ज्याअर्थी मयत नारसिंग लोटा उर्फ लोटू पावरा हे दि. २५/०८/२०२१ रोजी मौजे भोईटी ता. शिरपूर जि. धुळे येथे त्यांचे राहते घरी मयत झालेले असून अर्जदार नं. १ ते ३ हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७. कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. २१/०२/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरककत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही. असे समजण्यात येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. ७/१/२०२५
सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** — कोर्टाचा शिक्का — **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे — दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

निशाणी नं.६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो.ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ३४/२०२५

**१) सरोज रसिकलाल गुजराथी,** रा. शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
**२) दर्शन रसिकलाल गुजराथी,** रा.सिल्वासा, दादरा नगर हवेली
**३) वैशाली सुनिल खडायते,** रा.नाशिक ता. जि. नाशिक
**४) रुपाली सौरभ शाह,** रा.नंदुरबार ता. जि. नंदुरबार.... अर्जदार

।।विरूध्द।।

कोणीही नाही ... जाबदेणार

X

रसिकलाल टिकमलाल गुजराथी (मृत्यू दि. ३१/१२/२०२२)
रा. शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे. ... मयत

ज्याअर्थी रसिकलाल टिकमलाल गुजराथी हे ता. ३१/१२/२०२२ रोजी मौजे शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरच्या वारस दाखल्याची शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. २०/०२/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरक त/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही. असे समजण्यात येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. ६/१/२०२५
सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** — कोर्टाचा शिक्का — **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे — दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

निशाणी नं.६

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो.ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ३१/२०२५

**१) जिजाबाई दगा पाटील, २) अनिल दगा पाटील**
**३) सुनिल दगा पाटील,** अर्ज नं. १ ते ३ रा.करवंद ता. शिरपूर जि. धुळे.
**४) कविता महेंद्र पवार,** रा. मंदाने ता. शहादा जि. नुंदरबार .... अर्जदार

।।विरूध्द।।

कोणीही नाही ... जाबदेणार
**कै. दगा काशिराम पाटील (मृत्यू दिनांक ०२/०१/२०२४**
मृत्यू ठिकाण करवंद ता. शिरपूर जि. धुळे .... मयत

ज्याअर्थी अर्जदार नंबर नं. १ ते ४ हे मयत कै. दगा काशिराम पाटील यांचे वर अर्जदार हे पत्नी, मुलगा असे कायदेशीर वारस म्हणून अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ सेक्सन २ प्रमाणे वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज या मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की,तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदार नं. १ ते ४ यांचे व्यतिरिक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. २०/०२/२०२५ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधींमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदार नंन. १ ते ४ यांच्या तोंडी पुरावा घेवून त्या आधारे मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार नं. १ ते ४ यांनी केलेल्या मागणी प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर शिरपूर यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** — कोर्टाचा शिक्का — **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर — दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

निशाणी नं.६

**शिरपूर येथील दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दिवाणी कि. अर्ज नं. २१/२०२५

**१अ) ज्योती जयदेव खोंडे, १ब) याचना जयदेव खोंडे**
**१क) भावेश जयदेव खोंडे**
**२) विश्वनाथ बालू खोंडे,** अर्जदार नं. १ अ ते २
रा. ८ अ. न्यू योगेश्वर कॉलनी, शिंगावे शिवार, शिरपूर जि. धुळे.
**३) प्रतिभा अशोक चित्ते** रा. सर्व्हे नं. न२०९, त्रिमूर्ती कॉलनी,
संत तुकाराम नगर, भोसरी, पुणे. .... अर्जदार

।।विरूध्द।।

कोणीही नाही ... जाबदेणार

X

बालू उत्तम खोंडे, रा. ८ अ, न्यू योगेश्वर कॉलनी,
शिंगावे शिवार, शिरपूर जि. धुळे मृत्यू दि. १४/०३/२०२४... मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. शिरपूर न्यायालयात मयत बालू उत्तम खोंडे रा. शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे हे दिनांक १४/०३/२०२४ रोजी मौजे शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास त्यांनी दि. १८/२/२०२५ रोजी ठीक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक ६/१/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीसदिली असे.

**कनिष्ठ लिपिक** — कोर्टाचा शिक्का — **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर — दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

निशाणी नं.६/ड

**शिरपूर येथील दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दिवाणी कि. अर्ज नं. ३५/२०२५

**१) आशाबाई साहेबराव राजपूत,** उ. व. ५७, कामधंदा : घरकाम
**२) दिपक साहेबराव राजपूत,** उ. व. ४१, कामधंदा : शेती
**३) जयपाल साहेबराव राजपूत,** उ. व. ३७, कामधंदा : शेती
अ.नं. १ ते ३ **रा. जैतपुर ता. शिरपूर जि. धुळे.**
**४) अनिता अनिलसिंग गिरासे,** उ. व. ३५, कामधंदा : गृहिणी
रा. दोंडाईचा, ता. शिंदखेडा जि. धुळे. .... अर्जदार

।।विरूध्द।।

कोणीही नाही ... जाबदेणार

X

साहेबराव बंडूसिंग राजपूत मृत्यू दिनांक ०२/११/२०२१
रा. जैतपूर ता. शिरपूर जि. धुळे ... मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. शिरपूर न्यायालयात मयत साहेबराव बंडूसिंग राजपूत हे दि. ०२/११/२०२१ रोजी जैतपूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेली असून अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास त्यांनी दि. २१/२/२०२५ रोजी ठीक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक ७/१/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीसदिली असे.

**कनिष्ठ लिपिक** — कोर्टाचा शिक्का — **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर — दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

निशाणी नं.६

**शिरपूर येथील दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दिवाणी कि. अर्ज नं. ३/२०२५

**१) श्रीमती मथुराबाई धनराज पाटील, २) मोतीलाल धनराज पाटील,**
**३) रेखाबाई सोपान पाटील, ४) कै. सुनिलन धनराज पाटील**
**(मयत दि.२२/८/२०२२) मयत वारस**
**४अ) श्रीमती सिमाबाई सुनिल पाटील, ४ब) गायत्री सुनिल पाटील**
**४क) अंकित सुनिल पाटील**
नं. १ व २ रा. अर्थे बु.।। ता. शिरपूर जि. धुळे
नं. ३ रा. मांडळ, ता. अमळनेर जि. जळगांव
नं. ४ अ ते ४ क रा. अर्थे बु.।। ता. शिरपूर जि. धुळे .... अर्जदार

।।विरूध्द।।

कोणीही नाही ... जाबदेणार
कै. धनराज उदा पाटील, मृत्यू दि. ४/९/२०२४
कै. सुनिल धनराज पाटील मृत्यू दि. २२/८/२०२२
रा. अर्थे बु.।। ता. शिरपूर जि. धुळे ... मयत

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

अर्जदार याने म. दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर, शिरपूर यांचे कोर्टात दिवाणी कि. अर्ज नं. ३/२०२५ चा जन्म बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८७२ कलम २ प्रमाणे वारस दाखलासाठी अर्ज केला आहे. अर्जदार नं. १ चे पती कै. धनराज उदा पाटील, मृत्यू दि. ४/९/२०२४ रा. अर्थे बु.।। ता. शिरपूर जि. धुळे येथे वृद्धपकाळाने मयत झाले आहेत. तसेच अर्जदार नं. १ चा मुलगा कै.सुनिल धनराज पाटील, मृत्यू दि. २२/८/२०२२ रोजी रा. अर्थे बु.।। ता. शिरपूर जि. धुळे येथे अर्जदार नं. १चे पती व मुलगा हे अर्थे बु.।। ता. शिरपूर जि. धुळे येथे राहत असल्याने त्याचा वारस दाखला हा शैक्षणिक कामासाठी तसेच शासकीय व निमशासकीय योजनांसाठी लाभासाठी गरजेचा होता. अर्जदार नं. १ ते ३ व ४ अ ते ४ क यांचे नावे लावणे कामी वारस दाखल्यासाठी अर्जदार नं. १ ते ३ व ४ अ ते ४ क यांनी सदरचा अर्ज केला आहे.

याकामी कोणाचेही कोणतीही कायदेशिर तक्रार असल्यास मे. न्यायालयात दिनांक १३/२/२०२५ रोजी सकाळी ठिक १०.३० वा. स्वत: किंवा वकिलामार्फत हजर राहून हरकत नोंदवावी. तसे न केल्यास मे.न्यायालयात योग्य तो पुढील आदेश करावा लागेल. याची नोंद घ्यावी. स्थळ : शिरपूर दिनांक ३/१/२०२५

**कनिष्ठ लिपिक** — कोर्टाचा शिक्का — **सहा. अधिक्षक**
सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. शिरपूर — सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. शिरपूर

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे धुळे ता. जि. धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील.

स.नं. ४३६/३+४३७/२ पैकी प्लॉट नं. ३७ चे एकूण क्षेत्र ५०.०० चौ. मी. यात दोन मजली आर. सी.सी. बांधीव घर, बोरींग, नळ, वीज कनेक्शनसह हे वली मोहम्मद हनीफ अन्सारी, यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकाशा प्रमाणे.

मिळकतीचे मालक वली मोहम्मद मोहम्मद हनीफ अन्सारी, रा. रहेबर बाग, जामचा मळा, धुळे यांनीन वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदे करार केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांरण व्यवहार, खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणे प्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे आशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरुन, माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. १९/०१/२०२५

**ॲड.दानिश अहमद अ.रऊफ (शेख)**
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर,८०फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे
**मो. ९८८१९२९४२४** (नोटीस देणारतर्फे ॲडव्होकेट)


## CHANGE NAME

My Previous Name Was
**AABID AKHTAR WALI MUHAMMAD**
And My New Name Is
**AABID AKHTAR WALI MOHAMMAD ANSARI**
Add:-6626, Maulana Azad Road, Ansar Chouk, Valli Pura Dhule-424001


**महाराष्ट्र शासन**
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक (उत्तर) बांधकाम विभाग, धुळे
लिलाव सुचना क्र.१ सन २०२४-२५

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, धुळे (दुरध्वनी क्र.०२५६२-२८८७६३) हे सा.बां.उपविभाग दोंडाईचा अंतर्गत सोनगीर चिमठाणे दोंडाईचा रस्ता प्ररामा-१ किमी १८/८०० ते ५६/२०० (भाग-सोनगीर ते दोंडाईचा) मध्ये ३०.०० मी रुंदितील १००२ झाडे तोडणे करीता लिलाव करावयाचा आहे.

| | | |
|---|---|---|
| लिलावाचा दिनांक | :- | दि.३१/०१/२०२५ |
| लिलावाचे ठिकाण | :- | सा.बां.उपविभाग, दोंडाईचा |

**टिप-** इच्छुक लिलावदारांना लिलावाचे वेळापत्रक व इतर माहिती सा.बां.(उत्तर) विभाग, धुळे च्या नोटीस बोर्डावरुन प्राप्त करुन घेता येईल.

१) लिलावाचे साहित्य आपणास सोनगीर चिमठाणे दोंडाईचा रस्ता प्ररामा-१ किमी १८/८०० ते ५६/२०० (भाग- सोनगीर ते दोंडाईचा) परिसरात पाहण्यास मिळेल.
२) लिलाव प्रक्रियेमध्ये सहभाग होऊ इच्छित असलेल्या लिलावदारांना प्रत्यक्ष जागेवर जाऊन पात्रता मिळविणेसाठी आवश्यक दस्तऐवजांची पुर्तता करावी लागेल. तसेच त्याबाबत आवश्यक इसारा रक्कम इ. ची पुर्तता करावी लागेल.
३) लिलावामध्ये भाग घेण्याकरिता शुल्क (नापरतावा) रुपये ५९०/- **Demand Draft** स्वरुपात कार्यकारी अभियंता, सा.बां. (उत्तर) विभाग, धुळे किंवा उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग, दोंडाईचा यांचे नावे दि.३१/१/२०२५ पर्यंत भरणा करावा लागेल.
४) इच्छुक लिलावदारांना लिलावाच्या दिवशी लिलावाच्या ठिकाणी सकाळी ११.०० वाजेपर्यंत उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग, दोंडाईचा या कार्यालयात आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करावी.
५) अटी व लिलाव सुरु होण्यापूर्वी इसारा रक्कमेपोटी **FDR/DD** स्वरुपात रक्कम रु.३५,०००/- कार्यकारी अभियंता, सा.बां.(उत्तर) विभाग, धुळे किंवा उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग, दोंडाईचा कार्यालयात भरणे आवश्यक आहे.
६) कोणतेही काम बेकायदेशीर होणार नाही याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
७) लिलावाचा माल उचलण्यापूर्वी लिलावाच्या दिवसापासून २४ तासात लिलावात लागलेली बोली रक्कम कार्यकारी अभियंता, सा.बां.(उत्तर) विभाग, धुळे किंवा उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग, दोंडाईचा कार्यालयात भरणा करण्यात यावा. रक्कम भरणा केल्यानंतर पुढील २४ तासात लिलावाचे
८) साहित्य आपल्या ताब्यात घेण्यात यावे.
९) झाडे तोडणे व जागेवरुन उचल करणे पर्यंत व सुरक्षेची जबाबदारी यशस्वी ठेकेदाराची राहील.
१०) शासनाने ठरविण्यात आलेल्या किंमतीपेक्षा कमी दरआल्यास लिलाव रद्द करण्यात येईल. सदर लिलाव फेरबदल करण्याचे अथवा रद्द करण्याचा अधिकार खालील स्वाक्षरीकाराने राखून ठेवला आहे.
११) झाडे तोड झालेल्या मालाची तपासणी म.सहा.वनसंरक्षक (जकासा व कॅम्पा) धुळे यांचेकडून करण्यात येईल तसेच माल वाहतुक परवानगी सक्षम स्तरावरुन घेण्यात यावी. विना परवानगी माल वाहतुक करता येणार नाही.
१२) वृक्षतोड करतांना विद्युत वाहीनी बाबत अडचणी दुर करणे संबंधीत ठेकेदाराची राहील.
१३) वृक्षतोड अधिनियम १९६४ तसेच महसुल व वनविभागाची अधिसुचना **MIS**/१०/०४१७/**CR-243** दि.०१/०८/२०१७ याचे तंतोतंत पालन करावे.
१४) वृक्षतोड पूर्ण काम होईपर्यंत मनुष्य किंवा जिवितहानी होणार नाही ही जबाबदारी ठेकेदाराची राहील.

**कार्यकारी अभियंता**
**सा.बां.(उत्तर) विभाग, धुळे**

जाहिरात क्र जिमाका/धुळे/जाहि /१४०/२०२४-२५

## पान १ वरुन

### सरसंघचालकांविरोधात युवक काँग्रेसचे आंदोलन

परिसरात शांतता प्रस्थापित करण्यात यश आले आहे.

**संघावर बंदी घाला, युवक काँग्रेसची मागणी**

सरसंघचालक डॉ.मोहन भागवतांनी देशविरोधी वक्तव्य करून, सरदार भगत सिंह, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस इत्यादिसह अनेक क्रांतिकारकांचा अवमान केला आहे. त्यांनी केलेल्या या वक्तव्याबद्दल त्यांनी माफी मागावी, अशी मागणी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदयभानू चीब यांनी केली आहे. स्वातंत्र्यसैनिकांच्या अपमाना विरोधात युवक काँग्रेस आज रस्त्यावर उतरली आहे. यापूर्वीही केंद्रीय गृहमंत्र्यांनी आपल्या थोर महापुरूषांचा अवमान केला आहे. या वक्तव्याचे आम्ही निषेध करतो आहे. तसेच संघावर बंदी घालावी अशी आमची मागणी असल्याची ही प्रतिक्रिया प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष कुणाल राऊत यांनी केली आहे.

### कुंभमेळ्यात आग

सहभागी झाले आहेत. प्रयागराजमधील महाकुंभ मेळ्याच्या सातव्या दिवशी या परिसरात भीषण आग लागली. मंडपात जेवण बनवत असताना आग लागल्याची सूत्रांची माहिती आहे. मात्र, आग कशामुळे लागली याबाबत कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नाही. आग अनेक तंबूमध्ये पसरलेली असून तिथे असलेल्या सिलेंडरचा देखील स्फोट होत आहे. आत्तापर्यंत वीस ते पंचवीस तंबू जळाले आहेत.

### हल्लेखोर बांगलादेशी घुसखोर असल्याचा संशय

आंतरराष्ट्रीय मुद्दा दिसत नाही, असे आरोपीच्या वकिलांनी म्हटले आहे.

**बांगलादेशी घुसखोर असल्याचा आरोप**

सैफ अली खानवर चाकूहल्ला करणारा आरोपी शहजाद हा बांगलादेशी घुसखोर असल्याचा आरोप करण्यात येत आहे. बांगलादेशातून मुंबईत आला आणि मुंबईत हाऊस किंपींग एजन्सीमध्ये कामाला होता, असे वेगवेगळे दावे केले जात आहेत. मात्र, अधिक माहिती आता पोलीस तपासानंतर समोर येणार आहे.

१६ जानेवारीच्या मध्यरात्री २ ते २.३० च्या सुमारास सैफ अली खानच्या राहत्या घराच्या ११ व्या मजल्यावर दरोडेखोर शिरला. यावेळी सैफने आपल्या कुटुंबाच्या संरक्षणासाठी या हल्लेखोराचा सामना केला. सैफवर चाकूने सहा वार करण्यात आले. याशिवाय अभिनेत्याच्या घरातील मदतनीस सुद्धा यात जखमी झाली होती. रक्तबंबाळ अवस्थेत सैफला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. लीलावती रुग्णालयात त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. सध्या रुग्णालयातील वरिष्ठ डॉक्टरांच्या मते, सैफची प्रकृती स्थिर असून त्याच्या जीवाला कोणताही धोका नाही.

### नंदुरबारच्या पालकमंत्रिपदी कोकाटे

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे करण्यात आली होती. त्याची दखल घेण्यात आली. शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची पालकमंत्री म्हणून नियुक्ती केल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मंत्री माणिकराव कोकटे यांच्यावर पालकमंत्रिपदाची जवाबदारी देण्यात आल्याने पक्ष संघटन वाढीस मदत होणार आहे. तसेच जिल्ह्याच्या विकासासाठी विविध योजना राबवण्यासाठी पाठपुरावा करू, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.अभिजित मोरे यांनी सांगितले. २६ जानेवारी अर्थात प्रजासत्ताक दिनी नंदुरबार शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा जिल्हा मेळावा घेण्यात येणार असून त्यासाठी तयारी करण्यात येत आहे, असे डॉ.मोरे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. मदर टेरेसा हायस्कूलच्या प्रांगणात २६ जानेवारी रोजी दुपारी मेळावा घेण्यात येणार आहे. या मेळाव्यात पक्ष संघटन, येणाऱ्या स्वराज्य संस्थेच्या निवडणूकासंदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच पालकमंत्री माणिकराव कोकाटे यांचा हृदय सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती डॉ.मोरे यांनी दिली.

### राष्ट्रपतींच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी सन्मान

सहाय्याचा योग्य तो उपयोग करत आपल्या गावातील तलावात अत्याधुनिक पद्धतीने मत्स्यपालन सुरू केले. योहान गावित यांनी मत्स्यपालन व्यवसायाला फक्त आर्थिक उपजीविकेपुरते मर्यादित ठेवले नाही, तर या व्यवसायातून इतर शेतकऱ्यांनाही सक्षम बनवले. त्यांनी आपल्या पिंजऱ्यांमध्ये मत्स्यबीज तयार करून ते शेतकऱ्यांना पुरवले. याशिवाय, मत्स्यपालनासाठी लागणारे साहित्य पुरवून शेतकऱ्यांच्या व्यवसायिक गरजा भागवल्या. आज त्यांच्या या कामामुळे भवरे गाव व परिसरातील अनेक शेतकरी मत्स्य व्यवसायाकडे वळले असून आपली आर्थिक स्थिती सुधारत आहेत.

योहान गावित यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची प्रशंसा फक्त महाराष्ट्रातच नव्हे, तर केंद्र शासन स्तरावरही झाली. महाराष्ट्र राज्याचे सहआयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग यांनी त्यांच्या प्रकल्पाची पाहणी करून केंद्र शासनाला सादर केलेल्या अहवालात या प्रकल्पाचे यश अधोरेखित केले. यानुसार, केंद्र शासनाने त्यांची निवड करून प्रजासत्ताकदिनी राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानासाठी त्यांना निमंत्रित केले आहे. नुकतेच केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ आणि जिल्हाधिकारी मित्ताली सेठी यांनीही या प्रकल्पाला भेट देवून योहान गावित यांचे कौतुक केले होते. भारतीय पोस्ट विभागाचे निरीक्षक भरत चौधरी आणि पोस्टमॅन सुनिल गावित यांनी राष्ट्रपतींच्या सन्मानाचे औपचारिक आमंत्रण योहान गावित यांना सुपुर्द केले.

### पालिकेच्या कारवाईला शासनाकडून स्थगिती

सील करणे, श्रीराम सामाजिक, सांस्कृतिक क्रीडा मंडळ नंदुरबार संस्थेशी केलेला करारनामा ९ जानेवारी २०२५ रोजी रद्द करणे, नाट्यगृहाची देखभाल व परिरक्षणाकरीता नवीन मक्तेदार नेमण्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया सुरु करणे या कारवाईला स्थगिती दिली आहे. त्याबाबतचा आदेश नगरविकास विभागाच्या सहसचिवांनी नंदुरबार जिल्हाधिकारी यांना जारी केला आहे. पुढील कारवाईस स्थगिती देण्यात आली असून आदेशानुसार आवश्यक कार्यवाही करुन शासनास तातडीने अवगत करण्याचेही नमूद केले आहे.

### गजाननबापू पाटील यांचे निधन

खान्देशला संघर्षयात्री म्हणून आहे. परिस्थितीशी दोन हात करत त्यांनी जिल्ह्यासह खान्देशात आपली वेगळी ओळख निर्माण केली. धुळे तालुका सुपरवायझिंग कमिटीचे चेअरमन म्हणून त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीला सुरुवात केली. पुढे धुळे पंचायत समितीचे उपसभापती, धुळे- नंदुरबार जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती, श्री.कालिका विद्या प्रसारक संस्थेचे चेअरमन, तापी खोरे पाटबंधारे मंडळाचे उपाध्यक्ष, धुळे तालुका संघर्ष समितीचे अध्यक्ष, धुळे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे धुळे जिल्हाध्यक्ष आदी पदे त्यांनी भूषवली. आताचा धुळे ग्रामीण म्हणजेच पूर्वाश्रमीच्या कुसुंबा विधानसभा मतदारसंघात केवळ चारशेंवर मतांनी त्यांचा पराभव झाला होता. त्यांची अंत्ययात्रा सोमवारी सकाळी ११ वाजता त्यांच्या शिरुड येथील राहत्या घरापासून निघणार असून शिरुड येथील जय बाबाजी इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्रांगणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. ते माजी सरपंच वत्सलाताई पाटील यांचे पती, माजी सरपंच विजय पाटील यांचे वडील, पं.स.सदस्या सुवर्णा पाटील यांचे सासरे व जि.प.सदस्य आशुतोष पाटील व डॉ.अखिलेश पाटील यांचे आजोबा होत. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. गजानन बापू पाटील यांच्या निधनाने जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मोठी, न भरुन निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. दरम्यान, सायंकाळी सहा वाजेपासून त्यांचे पार्थिव शिरुड येथील निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. गजानन पाटील यांच्या निधनाचे वृत्त धडकताच आप्तस्वकीयांसह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील असंख्य मान्यवरांनी उपस्थिती लावली होती.

## आठव्या वेतन आयोगाला वर्ष एकोणतिसचा मुहूर्त उजाडणार निर्णयाचे राज्य सरकारी कर्मचारी मध्य.महासंघातर्फे स्वागत

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी) - केंद्र सरकारने दिलेला आठवा वेतन आयोग केंद्रीय कर्मचाऱ्यांना २०२६ साठी पगारवाढ देणारा असून या निर्णयाचे राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी महासंघाने स्वागत केले आहे. आजवरचा इतिहास पाहता आठवा वेतन आयोग महाराष्ट्रातील राज्य शासकीय, निमशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागू होण्यास २०२९ हे वर्ष उजाडण्याची शक्यता आहे. असे प्रतिपादन राज्य सरकारी मध्यवर्ती महासंघाचे सरचिटणीस सुभाष गांगुर्डे यांनी केले आहे.**

यासंदर्भात राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, सन २०१६ मध्ये केंद्र सरकारने लागू केलेला सातवा वेतन आयोग राज्य लागू करण्याचे आदेश राज्य सरकारने २०१९ या लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या वर्षात काढला होता. आता आठवा वेतन आयोगही २०२९ या निवडणूक वर्षात लागू होण्याची शक्यता प्रशासनातील जाणकारांनी वर्तवली आहे. वेतन आयोगाच्या वेळीच आम्ही फिटमेंटसाठी २.८६ हे प्रमाण वापरण्याची आग्रही भूमिका घेतली होती. ती यावेळी तरी स्वीकारावी. केंद्र सरकार आयोगाच्या शिफारशी जाहीर केल्यानंतर राज्य सरकार त्या लागू करण्यात वेळकाढूपणा करते. तसे न करता केंद्रातील आयोग आपला अभ्यास करीत असताना व राज्य सरकारने गृहपाठ करण्यासाठी समिती नेमायला हवी. सध्या महागाई भत्ता ५० टक्क्यांवर पोहोचला आहे. सरकारने शब्द दिल्याप्रमाणे तो आता मूळ वेतनात विलीन करावा. केंद्राप्रमाणे राज्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांना वेतन दिले जात नाही. ग्रामीण भागातील शासकीय कर्मचारी, शिक्षक, तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांच्या वेतनात खूप तफावत असते. ही तफावत दूर केली जावी. अशी मागणी सुभाष गांगुर्डे यांनी केली आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, केंद्र सरकारने २०१६ मध्ये सातवा वेतन आयोग लागू केल्यानंतर १७ जानेवारी २०१७ रोजी राज्य सरकारने निवृत्त अप्पर मुख्य सचिव के. पी. बदयी यांच्या नेतृत्वाखाली वेतन सुधारणा समिती स्थापन केली.या समितीला सातवा वेतन आयोग राज्यात कशाप्रकारे लागू करता येईल याच्या शिफारशी करण्याची जबाबदारी देण्यात आली. या समितीने दोन खंडात शिफारशी सादर केल्या. पहिला खंड ५ डिसेंबर २०१८ रोजी सादर केला. त्यानंतर राज्य सरकारने १ जानेवारी २०१९ रोजी या शिफारशी लागू करणारा आदेश जारी करून जानेवारी २०१६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वेतनात वाढ केली.

**राज्यासमोर मोठे आव्हान**

सातवा वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन आणि निवृत्तीवेतन २३.५ टक्क्यांनी वाढले होते. आठव्या वेतन आयोगाची वाढ २५ टक्के राहू शकते असे राज्या तील उच्च पदस्थ अधिकाऱ्यांचे मत आहे. २०१९ ला सातवा वेतन आयोग लागू झाल्यावर २० लाखाहून अधिक शासकीय, निमशासकीय, अनुदानित संस्थांमधील कर्मचारी यांचे वेतन व निवृत्ती वेतन यांच्यावर राज्याला दरवर्षी सुमारे २१ हजार ५० कोटीचा अतिरिक्त भारत सहन करावा लागला. शिवाय ३६ महिन्यांचा थकीत वेतन, निवृत्ती वेतन यापोटी राज्य सरकारला ३४ हजार कोटीचा भुरदंड सोसावा लागला होता. आठवा वेतन लागू झाल्यावर यापेक्षाही अधिक भार सहन करावा लागण्याची शक्यता असून तेच मोठे आव्हान आहे.

## निधन वार्ता

### सुभाषचंद्र शहा



शिंदखेडा, दि.१९- शिंदखेडा, शिरपूर, धमाणे, दोंडाईचा या शाखांचे अनेक वर्ष शाखाधिकारी म्हणून कामकाज केलेले धुळे जिल्हा बँकेचे सेवानिवृत्त अधिकारीसुभाषचंद्र गोविंददास शहा (वय ८४) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. जिल्हा बँकेत अत्यंत प्रामाणिक, शिस्तप्रिय तसेच पोटतिडकीने काम करणारा अधिकारी अधिकारी म्हणून त्यांचा परिचय होता. शाह यांचे पश्चात पत्नी, दोन मुलगे, सुना, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. ते जितेंद्र शहा व ओम कॉम्प्युटरचे संचालक पंकज शहा यांचे वडील होत.

## नंदुरबार पालकमंत्रीपदी माणिकराव कोकाटेंच्या निवडीने शहाद्यात जल्लोष



**शहादा, दि.१९ (का.प्र.)- महायुती सरकारमधील कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांची नंदुरबार जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी नियुक्ती झाल्यानंतर शहाद्यातील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सिन्नर विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राज्याचे कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांची नंदुरबार जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी नियुक्ती झाल्याबद्दल राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अभिजीत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शहादा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ जोरदार फटाके फोडत वाजंत्री वाजत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष माधवराव पाटील, शहराध्यक्ष सुरेंद्र कुवर, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष संजय खंडारे,राष्ट्रवादीचे जिल्हा सचिव संतोष पराडके, राष्ट्रवादी युवकचे जिल्हा उपाध्यक्ष छोटूभाऊ कुवर, राष्ट्रवादी डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ नितीन पवार, राष्ट्रवादीचे प्रकाश पवार, गणेश राजे पाटील, शहर उपाध्यक्ष चुडामण सूर्यवंशी, सुभाष शेंबडे, गोविंद सामुंद्रे,तालुका उपाध्यक्ष किशोर पाटील, रामेश्वर बिरारे, राकेश पाटील, समद शहा, संजय ठाकरे, पुष्पक चौधरी, नागसेन गवळे, राजू ठाकरे ,श्याम ढीवरे, योगेश शिंदे, सुनील ठाकरे उपस्थित होते.

## धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे क्रिकेट खेळाडूंसाठी तेविस जानेवारीला निवड चाचणी



**शिरपूर/धुळे, दि.१९- धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे तेविस वर्षाखालील क्रिकेट निवड चाचणी तेविस जानेवारी रोजी घेण्यात येणार आहे.**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे २३ वर्षाखालील आमंत्रित क्रिकेट स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेत धुळे जिल्हाचा संघ सहभागी होणार आहे. धुळे जिल्ह्याच्या संघाचा समावेश होण्यासाठी धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे २३ जानेवारी गुरुवार रोजी सकाळी ९ वाजता कुंडाणे मैदानावर निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे. तसेच या निवड चाचणीसाठी ज्या खेळाडुंचा जन्म १-सप्टेंबर २००२ नंतरचा असेल अशाच खेळाडूस निवड चाचणीत सहभाग घेता येईल. खेळाडूंनी पांढरा गणवेश व क्रिकेटचे साहित्यासह निवड चाचणीसाठी उपस्थित राहावे. सोबत येताना जन्म दखला (डिजिटल), आधार कार्ड, टी. सी., दहावी व बारावीची मार्कशीट या आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह कागदपत्रांसह उपस्थित राहावे. तसेच अधिक माहितीसाठी धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशन धुळे यांच्याशी व राजन चौक यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल, प्रमुख सल्लागार राजवर्धन कदमबांडे, सचिव प्रितेश पटेल व इतर कार्यकारिणी सदस्य यांनी केले आहे.

## प्रेरणा बहुउद्देशीय संस्थेतर्फे विधवा महिलांचा सन्मान

धुळे, दि.१९- शहरातील मालेगाव रोड परिसरातील काळुबाई मंदिराच्या प्रांगणात प्रेरणा बहुउद्देशीय संस्थेतर्फे शहरातील विधवा महिलांचा सन्मान सोहळ्यासह तिळगुळ देत भेट वस्तु देण्याचा कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. या कार्यक्रमात शहरातील चाळीस ते पन्नास महिला सहभागी झाल्या. संस्था अध्यक्ष पार्वती परशुराम जोगी यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील एकल अर्थात विधवा महिलांना समाजात दिल्या जाणाऱ्या दुय्यम वागणुकीमुळे एलजीबीटीक्युआय प्लस कम्युनिटी मेंबर्स यांच्याकडून मकर संक्रांतीनिमित्त तिळगुळ देवून सन्मान करण्यात आला. तसेच भेट वस्तुही देण्यात आल्या. समाजात सन्मानपुर्ण वागणुक कशी मिळेल ? यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. कोणत्याही प्रकारची मदत लागल्यास प्रेरणा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था एलजीबीटीक्युआय प्लस कम्युनिटी मेंबर्स त्यांची मदत करतील.

## पान १ वरुन

### नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे रक्तदान शिबीर

केला आहे. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन शहादा पंचायत समिती सदस्या सौ.रोहिणी दिनेश पवार, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार दिनेश पवार व उपसरपंच शरद साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ह.भ.प.शुभम महाराज, शेतकी विद्यालयाचे अध्यक्ष विजय मोरे, सचिव प्रशांत मोरे, जयवंत पवार, ग्रामपंचायत सदस्य आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संप्रदायाचे जिल्हाध्यक्ष ज्योतीसिंग चौरे, जिल्हा निरीक्षक सूर्यवंशी, पीठ ब्लड इन निड प्रमुख ललितेश गायकवाड, जिल्हा सचिव कांतीलाल पवार, तालुका अध्यक्ष सुकलाल पवार, प्रोटोकॉल अधिकारी प्रमोद भावसार, नंदुरबार जिल्हा ब्लड इन नीड प्रमुख विजय सोनवणे, जिल्हा कॅम्प प्रमुख वेदांत देसले, जिल्हा महिला प्रमुख शितलताई देसले, शहादा तालुकाप्रमुख मेहरबान भंडारी, जिल्हा युवा प्रमुख मनोज सुळे व सर्व भक्तगण यांनी विशेष परिश्रम घेतले.

धुळ्यात 'प्लास्टो' कंपनीचे आऊटलेट सुरू..
होलसेल रेटमध्ये सर्व साईजच्या टाकी उपलब्ध..




१०० ते १०००० लिटर पर्यंत क्षमता असलेल्या ३ लेयर, ४ लेयर, ६ लेयर, ८ लेयर मध्ये सर्व साईजच्या गोल व चौरस टाक्या हजर स्टॉक मध्ये उपलब्ध आहेत.
धुळ्यात प्लास्टो कंपनीच्या टाक्या मिळण्याचे एकमेव ठिकाण
शंकर विजय सॉ मिल
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे. मो. 9422285091

पाहिजेत
हुशार, अनुभवी व निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे.
-: संपर्क :-
मुणोत हॉस्पीटल
नेहरू चौक, देवपूर, धुळे
02562-224407

सेल! सेल!! सेल!!!
70% 50% 30% डिस्काऊंट सेल
फस्टक्राय स्टोर
ड्रेसेस व फूटवेअर वर चालू आहे! तरी या सुवर्णसंधीचा लाभ घ्या!!
पत्ता : घ.नं.२८५६, जे.बी.रोड, शिवाजी मेडीकल समोर, धुळे
फो.नं.०२५६२-३५६५३७

नवीन बंगला विकणे आहे
अग्रवाल नगर मधील 4 BHK, २ हॉल, २ किचन, ऑफिस रुम, लिफ्टची सोय, प्रशस्त कार पर्किंगची जागेसह नवीन फर्निचरसह बंगला विकणे आहे.
-: संपर्क :-
9518509869

पाहिजेत
हेल्पर – ४
सुपरवायझर – २
समक्ष भेटा! स.११ ते १
अशोका केमीकल वर्क्स
ई-५७, एमआयडीसी, अवधान, धुळे
9175068478

भाड्याने देणे आहे
ग.नं.४ व ५ बोळ येथे एकविरा कॅसेटच्या वरील दोन गाळे, भगवा चौक येथे १०X१३ चे शॉप भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
8888387548

भाड्याने देणे आहे
नगरपट्टी येथे लक्ष्मी डिजीटल समोर तळ घरातील १०X७० चे शॉप दोन्ही बाजुने शटर असलेले दुकान भाड्याने किंवा विकत देणे आहे.
-: संपर्क :-
प्रशांत भावसार फेटेवाले
9422287548

दुकान भाडे कराराने देणे
ग.नं.६ मधील १३X५४ ऑफिस, बँक व फायनान्ससाठी दुकान भाडे कराराने देणे आहे.
-: संपर्क :-
7498644970

घर विकणे आहे
वाडीभोकर रोड, श्रीराम नगर येथील ८ रुमचे दुमजली घर विकणे आहे.
-: संपर्क :-
9322009279

डॉक्टर पाहिजे
मुकटी येथे (ता.जि.धुळे) मेनरोडवर दवाखान्याचा पूर्ण सेटअप रेडी आहे. intrested Doctor ने संपर्क करावा.
-: संपर्क :-
7744009966
(जैन राहुल)

गरम पाण्याचा एकच उपाय...
USHA Crompton Racold BAJAJ




आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...
57 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

भाड्याने देणे
वलवाडी शिवार आधार नगरला लागून सर्व्हे नं.१२६ मधील पक्के गोडाऊन भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
9011894666

बंगलो व फ्लॅट विकणे आहे
पारोळा रोड लगत कॉटन मार्केट जवळ 2 BHK फ्लॅट व 4 BHK बंगला विकणे आहे.
-: संपर्क :-
9822545666

न्यू फ्लॅट विकणे आहे
SSVPS कॉलेज जवळ, सिद्धी व्यंकटेश अपार्टमेंट, प्रभात नगर येथील 2 BHK, 3 BHK फ्लॅट विकणे आहेत.
-: संपर्क :-
महेश माळी
9665696658



पाहिजेत
ऑफिस कामासाठी गरजू मुला-मुलींची त्वरीत भरती चालू आहे
वय : १८ ते ३० वर्षे/ शिक्षण १० वी पास/ नापास ते पदवीधर पगार : ७ हजारच्या पुढे
रहाणे + जेवण + मेडिकल मोफत
संपर्क :- वाडीभोकर रोड, धुळे/9657608459

पाहिजेत
दुकान/ऑफिस कामासाठी हुशार, मेहनती मुले पाहिजेत.
-: संपर्क :-
सम्राट बॅटरीज
पारोळा रोड, धुळे
9823241749
8329784099

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०